# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः06.04.2024** **वारःशनिवार**

---

1. रिझर्व्ह बँकेकडून या आर्थिक वर्षातलं पहिलं द्वैमासिक पतधोरण जाहीर; रेपो आणि इतर बँक दर जैसे थे
2. मतदारांचा सहभाग वाढवण्यासाठी शहरी आणि ग्रामीण भागातल्या मतदारांची मानसिकता लक्षात घेण्याचे मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांचे निर्देश
3. जम्मू काश्मिरच्या उरी सेक्टरमध्ये 2 दहशतवादी ठार, निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर सतर्कतेचा इशारा आणि
4. इराणवरील इस्त्रायलच्या हल्ल्याविरोधात इराणचा अमेरिकेवर हल्ल्याचा इशारा, अमेरिकेत अतिसतर्कतेचा इशारा

**आरबीआय**

रिझर्व्ह बँकेनं नवीन आर्थिक वर्षातलं पहिलं द्वैमासिक पतधोरण काल जाहीर केलं. यात बँकेनं रेपो दर आणि इतर बँक दरांमधे कोणतेही बदल केलेले नाहीत. रेपो सलग सातव्यांदा कायम ठेवण्यात आला आहे. 2024-25 या आर्थिक वर्षात सकल देशांतर्गत उत्पादन वाढीचा दर 7 टक्के असेल. आणि ग्राहक किंमत निर्देशांक आधारित महागाईचा दर साडेचार टक्के असेल असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. मार्चअखेर परदेशी चलनसाठा 64 हजार 560 कोटी डॉलर्स या विक्रमी पातळीवर गेल्याची माहिती गर्वनर शक्तीकांत दास यांनी दिली. गेल्या आर्थिक वर्षात रुपयाच्या आंतरराष्ट्रीय बाजारातल्या किंमतीत सर्वात कमी चढउतार झाल्याचं त्यांनी सांगितलं. भारतीय रिझर्व्ह बँक लवकरच यूपीआयच्या माध्यमातून बँक खात्यात रोख रक्कम जमा करण्याची सुविधा उपलब्ध करुन देणार आहे. यामुळे बँकांची रोख रक्कम व्यवहार प्रक्रिया अधिक कार्यक्षम होईल आणि ग्राहकांचीही सोय होईल असं बँकेचे गव्हर्नर शक्तीकांत दास यांनी काल मुंबईत सांगितलं. सेन्ट्रल बँक डिजिटल करन्सी अर्थात सीबीडीसी रिटेल ही प्रणाली, बँकांव्यतिरिक्त इतर देयक प्रणालींना वापरण्याची परवानगी देण्यात येत असल्याची माहिती दास यांनी दिली. छोट्या गुंतवणूकदारांना थेट गुंतवणूक करता यावी यासाठी एक मोबाईल ॲप सुरू करणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

**निवडणूक आयोग**

मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी निवडक जिल्ह्यांतील महापालिका आयुक्त आणि जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांना मतदारांचा सहभाग वाढवण्यासाठी मतदान केंद्र आधारित कृती आराखडा तयार करण्याचे निर्देश दिले आहेत. शहरी आणि ग्रामीण भागातल्या मतदारांची मानसिकता लक्षात घेऊन त्या प्रमाणे आराखड्यात बदल करावा, असंही त्यांनी सुचवलं आहे. निवडक जिल्ह्यांतले महापालिका आयुक्त आणि जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांबरोबर नवी दिल्लीत काल बैठक झाली. या बैठकीत अध्यक्षपदावरून राजीव कुमार बोलत होते. लोकसभा निवडणूकीत मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी एक परिषदही घेण्यात आली. देशातले 215 ग्रामीण आणि 51 शहरी भागातले मतदारसंघ हे मतदानाची कमी टक्केवारी असलेले आहेत. या भागातल्या मतदारांची मतदानाबाबतची उदासीनता लक्षात घेऊन विशेष कार्यक्रम तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. दिल्ली, मुंबई, चेन्नई, बंगळुरू, हैदराबाद, अहमदाबाद, पुणे, ठाणे,

नागपूर, पटणासाहिब, लखनौ आणि कानपूर यासंह बिहार आणि उत्तर प्रदेशातल्या काही निवडक जिल्ह्यातल्या निवडणूक अधिकारी या परिषदेला उपस्थित होते. तर काही निवडणूक अधिकारी दूरस्थ पद्धतीनं या परिषदेत सहभागी झाले होते.

**<u>काँग्रेस-वचननामा</u>**

कॉंग्रेस पक्षानं काल लोकसभा निवडणूकीसाठीचा वचननामा प्रसिद्ध केला. गरीब कुटुंबांना एक लाख रुपयांची वार्षिक मदत, प्रतिदिनी 400 रुपये किमान वेतनाची हमी, महिलांना केंद्र सरकारच्या नोकरीत 50 टक्के आरक्षण, किमान आधारभूत किंमतीना कायद्याचा आधार आणि जातनिहाय जनगणना हे या जाहीरनाम्यातले काही ठळक मुद्दे आहेत. सोनिया गांधी, राहुल गांधी आणि कॉंग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, यांनी काल नवी दिल्लीत हा वचननामा प्रकाशित केला. पायाभूत सुविधांमध्ये वाढ करण्याबरोबरच पुढील दशकात 23 कोटी लोकांची भाग्यरेषा बदलण्याचं वचनही कॉंग्रेसनं दिलं आहे. ही निवडणूक जिंकण्याचा विश्वास राहुल गांधी यांनी यावेळी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केला.

**<u>प्रचार सभा</u>**

लोकसभा निवडणूक प्रचारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सकाळी उत्तरप्रदेशातील सहारनपुर इथं जाहीर सभा घेणार आहेत. तर दुपारी राजस्थान मधील अजमेर तालुक्यात पुष्कर इथं ते सभा घेतील. राजस्थान मधील त्यांची ही तिसरी जाहीर सभा आहे. त्यानंतर संध्याकाळी पंतप्रधान उत्तरप्रदेशातील गाझियाबाद इथं रोड शो मध्ये सहभागी होणार आहेत. कॉंग्रेस पक्षाच्या वतीने आज  राजस्थान मधील जयपूर इथ  पक्षाच्या जाहीरनाम्याच्या अनुषंगानं मोठी प्रचार सभा होणार असून, त्यामध्ये कॉंग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी आणि राहुल गांधी सहभागी होणार आहेत.

**<u>घुसखोरी</u>**

जम्मू काश्मीरमधील बारामुल्ला जिल्ह्यात उरी सेक्टरमध्ये सबूर नाला या सीमावर्ती भागात काल दहशतवाद्यांनी केलेला घुसखोरीचा प्रयत्न सुरक्षा दलाच्या जवानांनी हाणून पडला. यावेळी झालेल्या चकमकीत 2 दहशतवादी ठार झाले. त्यानंतर सुरक्षा दलाच्या जवानांनी या भागात मोठी शोध मोहीम राबवली. यावेळी दोन ए के सिरीज रायफल्स, 4 ग्रेनेड आणि काही प्रमाणात स्फोटके जप्त केली. देशातील आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, भारत- पाक सीमेपलीकडून मोठ्या प्रमाणावर घुसखोरी होण्याची शक्यता असून, त्यासाठी सुरक्षा यंत्रणांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

**<u>इशारा</u>**

इस्त्राइल-गाझा युद्धाच्या पार्श्वभूमीवर, या आठवड्याच्या प्रारंभी इस्त्राईलने गाझा समर्थक इराण मध्ये हवाई हल्ला करून त्यांच्या सर्वात वरिष्ठ लष्करी कमांडर आणि अधिकारांच्या समूहाला ठार केलं होत. या घटनेचा बदला म्हणून इराण अमेरिकेवर हल्ला करू शकतो, त्यामुळे सर्व यंत्रणाना अतिसतर्कतेचा इशारा देण्यात आल्याची माहिती अमेरिकेच्या एका अधिकाऱ्याने दिली आहे. अमेरिकेतील तसच इस्त्राईलमधील काही महत्वाच्या इमारतींवर हा हल्ला होऊ शकतो अशी शक्यता वर्तवण्यात आली आहे.

**<u>अमेरिका भूकंप</u>**

अमेरिकेतील न्यूयॉर्क शहर, फिलाडेल्फीया, आणि वॉशिंगटन डीसी मध्ये काल भूकंपाचे धक्के बसले. या भूकंपाची तीव्रता 4 पूर्णांक 8 रिख्टर होती.  प्राथमिक माहिती नुसार आतापर्यंत यात कोणतीही जीवित अथवा वित्त हानी

झाल्याचं वृत्त नाही. त्यानंतर लागोपाठ 6 वेळा भूकंपाचे धक्के जाणवले. न्यूजर्सी क्षेत्रात भूकंप होणं ही दुर्मिळ घटना असून गेल्या 50 वर्षातला हा तिसरा शक्तिशाली भूकंप असल्याचं अमेरिकेच्या भूवैज्ञानिक सर्वेक्षण विभागान सांगितलं आहे.

**यूजीसी-टेलिमानस**

मानसिक आरोग्यासाठीच्या टेलि मानस या मोफत मदत क्रमांकाबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागृती करावी अशा सूचना विद्यापीठ अनुदान आयोगानं म्हणजेच यूजीसी नं सर्व उच्च शैक्षणिक संस्थांना दिल्या आहेत. यासंदर्भात आयोगानं सर्व विद्यापीठाचे कुलगुरू आणि महाविद्यालयांच्या प्राचार्यांना परिपत्रक पाठवलं आहे. टेलिमानस ही आरोग्य मंत्रालयाची सुविधा उत्कृष्ट काम करत असून, देशातल्या उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांनी या टेलीमानस सुविधेचा मोठ्या प्रमाणावर प्रचार करावा, असं आवाहन युजीसीनं केलं आहे. टेलि मानस हा उपक्रम आरोग्य मंत्रालयानं 2022 मध्ये जागतिक मानसिक आरोग्य दिनाच्या निमित्तानं सुरु केला आहे. ज्यामध्ये मानसिक आरोग्याच्या समस्यांविषयी 24 तास मोफत सहाय्य केलं जातं.

**सीबीएसई**

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळानं राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगानं मूल्यांकन आणि मूल्यमापन यामध्ये बदल केले आहेत. नवीन मूल्यमापन आता क्षमता आधारित प्रश्नांवर आधारित असेल. बहुपर्यायी प्रश्न, विशिष्ट परिस्थितीवर आधारित प्रश्न म्हणजेच case based प्रश्न यांच्यावर भर देण्यात येणार आहे. आणि छोट्या टीपा किंवा दीर्घोत्तरी प्रश्नांची संख्या कमी करण्यात येणार आहे. मात्र हे बदल 11 वी आणि 12 वी साठी असून नववी आणि दहावीसाठी मात्र हे बदल लागू असणार नाही, असं सीबीएसई नं स्पष्ट केलं आहे.

**हवामान**

देशाच्या पूर्व भागातली राज्ये आणि किनारपट्टीच्या भागात, आज आणि उद्या असे दोन दिवस उष्णतेची लाट कायम राहण्याची शक्यता भारतीय हवामान विभागानं व्यक्त केली आहे. गोवा आणि कर्नाटकच्या किनारपट्टीच्या भागात उद्यापर्यंत उष्ण आणि दमट हवामान राहील. तर केरळ, तामिळनाडू आणि पुद्दुचेरी मध्ये येत्या 9 तारखेपर्यंत उष्ण आणि दमट हवामान राहण्याची शक्यता आहे. ईशान्य भारतामध्ये येत्या 9 तारखेपर्यंत जोरदार पावसाची शक्यता आहे. तसंच आसाम, मेघालय, नागालँड, मणिपूर, मिझोराम, त्रिपुरा, अरुणाचल प्रदेश, सिक्कीम आणि पश्चिम बंगाल मध्ये पुढील 7 दिवस वादळी वारे आणि विजांसह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. तसंच 50 किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यताही हवामान विभागानं वर्तवली आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.नमस्कार.